१. नवोपक्रमाचे शीर्षक : **'मुळशीच्या आनंदमालाया विद्यार्थी कृतीपुस्तिका विकसित करताना शिक्षकांची स्वयं समृद्धी'**

२.नवोपक्रमाची गरज व महत्त्व :

मार्च २०२० जगावर आणि भारतावर मोठे संकट घेऊन आला. सारे जग ठप्प झाले.भारत ही त्याला अपवाद कसा असेल. भारतात ही लॉक डाऊन सुरु झाला. करोना मुळे जसे इतर क्षेत्रांवर परिणाम झाले तसे शिक्षण क्षेत्रावरही झाले.जिल्हा परिषदेचे शिक्षक प्रामुख्याने सहा ते चौदा वयोगटाच्या मुलांसोबत काम करतात.लहान मुलांसोबत काम करणारे शिक्षक हे प्रचंड संवेदनशील असतात, हा सर्वसामान्य अनुभव आहे. वर्गात मुलांना काही शिकवावे, त्यांना समजून सांगावे, मुलांना समजले की त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आपण टिपावा व आपणही आनंदी व्हावे असे त्यांचे कार्य सुरु असते.परंतु करोनाने स्थिती एकदम बदलली. इतर वेळी विविध अशैक्षणिक कामे जरी शिक्षकावर लादली जात असली तरी ती कामे पूर्ण केल्यावर शिक्षक मुलांसमोर जाऊन आपले मूळकाम करत राहतात. परंतु करोना लॉक डाऊन कालावधीत हसणारी,खेळणारी,बागडणारी मुलेच त्यांच्या समोरून गेली. प्रत्यक्ष वर्गाध्यापन बंद झाले.मूळ कामातील आनंद च नाहीसा होऊ लागला.ज्याकामाचे वेतन घेतो तेच काम होत नाही ही स्वतःच्या अस्मितेला धक्का देणारी बाब घडत होती.काही अपवाद वगळता सर्वच शिक्षकांना हे त्रासदायक होते. याही परिस्थितीत आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षक आटोकाट प्रयत्न करत होते आणि त्यासाठी हरतऱ्हेच्या नाविन्यपूर्ण मार्गांचा तेउपयोग करत होती. कुणी व्हिडीओ तयार करत होते, तर कुणी विविध वेबसाईट, पीडीएफतयारकरतहोते. अनेक प्रकारच्या अध्ययन कृती, उपक्रम असलेल्या कृतीपत्रिकाहीतयारकेल्याजातहोत्या. तरीहीया कालावधीत मुलांना शिकवायचे कसे,त्यासाठी स्वतःची तयारी असावी याची माहिती कोणाकडेच नव्हती,ना कोणाकडे या परिस्थितीचा अनुभव .सर्व यंत्रणाच चाचपडत होती. यातून मार्ग काढण्याची आवश्यकता होती.करोना कालावधीत शिक्षकांपुढे ढोबळमानाने तीन प्रकारचे विद्यार्थी होते

१)स्मार्टफोनज्यांच्याकडेआहेत- असे विद्यार्थी

२)साधाफोनज्यांच्याकडेआहेत- असे विद्यार्थी

३) ज्यांच्याकडेसंपर्काचेकाहीहीसाधनउपलब्धनाहीत- असे विद्यार्थी

अशा विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देण्यासाठी नाविन्यपूर्ण साधन निर्मिती करण्याची,त्यासाठीचे दैनंदिन अध्ययन अध्यापनामध्ये आलेले वेगळेपण लक्षात घेण्याची तसेच शिक्षकांना समजून घेऊन त्यांचा आत्मसन्मान जपण्याची गरज शिक्षण विस्तार अधिकारी या नात्याने जाणवली.या परिस्थितीत आलेला कार्याचा अनुभव पुढील काळात विद्यार्थी,त्यांचीं मानसिकता, ज्ञान संरचनावाद,प्रत्यक्ष कृतियुक्त शिक्षण असे केवळ शब्द न वापरता प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनात त्याचा वापर करून विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना यशाचा आनंद मिळत राहणार आहे.

**३) नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये -**

**१.करोना कालावधीत शिक्षकांचा आत्म सन्मान जपणे.**

**२.शिक्षकांना नाविन्यपूर्ण शिक्षण प्रवाहांची माहिती होणे.**

**३.शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यासाठी नाविन्यपूर्ण साहित्य विकसित करणे .**

**४. शिक्षकांच्या अध्ययन अध्यापन तसेच तांत्रिक ज्ञान व कौशल्यात भर पडणे.**

**४) नवोपक्रमाचे नियोजन -**

१.**नवोपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण** - मार्च २०२० मध्ये अचानक लॉक डाऊन सुरु झाला.कोरोना रोगाच्या प्रदुर्भावाने सर्वच क्षेत्रे ढवळून निघाली होते. त्याला शिक्षण क्षेत्र तरी कसे अपवाद असणार ?मुळशी तालुक्यातील शाळा नेहमीसारख्या कधी सुरु होतील हे कोणीही त्यावेळी ठामपणे सांगू शकणार नव्हते . त्या शाळा कशा सुरु करता येतील याबाबत शासनाने पत्र ही काढलेले होते . एकंदरीत परिस्थिती पाहता काही ठिकाणी शाळा सुरु होतीलही; परंतु अचानक रुग्ण सापडल्यास पुन्हा बंद होतील. ...आणि हे चालू बंद चे सत्र सुरु राहिल. मग मुलांचे शिक्षण बंदच राहणार का ? असा प्रश्न होता. मुलांचे शिक्षण बंद राहू नये यासाठी शासन, शिक्षक प्रयत्न करत होते. यामध्ये सुरक्षितता बाळगून शिक्षकांनी आठवड्यातून एक दोन दिवस शाळेत जाऊन अभ्यास देणे, स्वयं सेवकाच्या मदतीने शिक्षण, online शिक्षण, मोबाईल द्वारे शिक्षण (राज्यातील खूप शिक्षकांनी आपल्या मुलांसाठी लाखो व्हिडीओ तयार केले आहेत ), रेडीओ-टीव्ही द्वारे शैक्षणिक मालिकांचा प्रसारण करणे, TAB च्या सहाय्याने offline शिक्षण यासारख्या पद्धतीने प्रत्येकजण आपापल्या परीने शिकणे पुढे नेण्याचा प्रयत्न करीत होते

कोरोनामुळेची स्थिती जगपहिल्यांदाच अनुभवत होते.त्यामुळे शिक्षणाबाबत नेमकी कोणती दिशा स्वीकारणे योग्य ठरेल या बाबत कोणाकडेही फारसे अनुभव नव्हते ,आपले प्रश्न आपणच सोडविण्याची गरज होती. त्यात एक बाब प्रत्कर्षाने जाणवत आहे, ती म्हणजे मुले केवळ शिक्षकांच्याचं मदतीने वर्गात किंवा घरात शिकतील अशी स्थिती नव्हती. मुलांचे सुलभक म्हणून एकमेव शिक्षक असणार नाहीत, तर पालक व इतर स्वयंसेवकाना हे कार्य करावे लागणार होते. त्यांना आपली सुलभकाची भूमिका समजून घ्यावी लागणार . **त्यासाठी पाठ्यपुस्तकातील धडे शिकविणे म्हणजे केवळ शालेय शिक्षण नसते, हे समजून घेताना शिकणे म्हणजे काय ? ते कुठे कुठे घडत असते ? ते कसे घडते? याबाबत नवीन प्रवाह काय आहेत ? मेंदूवर आधारित शिकणे काय सांगत आहे ? मुलांचे शिकणे बहरण्यासाठी आपण सुलभन करताना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात ? मुलांचे शिकणे होण्यासाठी अवकाश कसा द्यावा ?**हे सर्व शिक्षकांनी नव्याने समजून घेणे व ते सुलभकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक होते.

२. **संबंधित व्यक्तींशी,तज्ज्ञांशी चर्चा**- प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासासाठी शिक्षक अस्वस्थ झाले होते. त्यांची अस्वस्था दूर करणे आवश्यक मुळशी तालुक्यातील पिरंगुट बीट मधील स्वयं प्रेरणेने काम करण्यासाठी तयार असणाऱ्या शिक्षकांशी फोन वरून चर्चा केली. करोना काळ संकट न मानता नवीन काही करण्याची संधी आहे असा विचार करून **'संकट**

**नव्हे संधी ' या whatsapp समूहाची स्थापना दि.१६.६.२०२० रोजी केली** .यामध्ये पिरंगुट बीट मधील ३५ शिक्षक स्वतःहून सहभागी झाले.या शिक्षकांशी चर्चा करून समूहाची पुढील दिशा मिळेपर्यंत काही कालावधीसाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित केली.

१. मुलांसाठी काम करू इच्छिणाऱ्या शिक्षकांचा समूह तयार करून बुद्धीमंथन ( brain storming) सुरु करणे.
२. कार्य करण्याची दिशा निश्चित करणे.
३. इयत्ता निहाय कामाचे नियोजन करणे.
४. उपलब्ध असणाऱ्या eसाहित्याचा विचार करून त्याचा आपल्या साहित्यात समावेश करणे .
५. झूम/गूगल मीटिंग facebook सारखी माध्यमे वापरून स्वसमृद्धीकरण, पालक समृद्धी, शिक्षक समृद्धी करणे.

समूहाला पुढे नेण्यासाठी पुढील कार्यपद्धती वापरली

- ऑनलाईन मिटिंग व शैक्षणिक गप्पांच्या माध्यमातून चर्चा करणे
- विविधांगी नमुन्यांचा( व्हिडीओ,ऑडीओ,कृतीपात्रिका इ.) अभ्यास करणे
- प्रत्येक नमुन्यातील बलस्थाने व उणिवा यांचा अभ्यास करणे
- अध्ययन साधनांचे विविध नमुने तयार करून पडताळणी आणि शोध सुरू ठेवणे.
- ज्ञानसंरचनावादी पद्धती समुहात वापरणे
- स्वसमृद्धी आणि बदलती शिक्षक भूमिका समजून घेणे .

याशिवाय साहित्य विकसनात मदत होईल यासाठी श्री.सचिन लोखंडे यांनी स्वतः घरातून शिकण्यास मोठ्यांची भूमिका, इनक्युबेशन,सुलभकाची भूमिका याविषयी लेख लिहिले. मेंदूवर आधारित अध्ययन, विषयांची एकात्मता, कृतियुक्त शिक्षण, ज्ञान संरचना वाद, २१व्या शतकातील अध्ययनाची कौशल्ये,एकच साहित्य वापरून विविध विषयांची उद्दिष्ट्ये कशी साध्य करायची याविषयी online चर्चा सत्रे घेतली.संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी शिक्षण तज्ज्ञ डॉ.व.सी.देशपांडे,श्री.संदिप वाकचौरे यांची online व्याख्याने आयोजित केली. एखाद्या नवोपक्रमाकडे वेगवेगळ्या कोनातून कसे बघितले जाते हे समजून घेण्यासाठी युनिसेफ च्या श्रीम.रेश्मा अगरवाल,रूम टू रीड चे श्री.राज शेखर, एल.एफ.इ. चे श्री.मधुकर बनोरी तसेच परिषदेतील ,बालभारती येथील अधिकाऱ्याशीवेळोवेळी चर्चा करून त्यांच्या बहुमूल्य सूचना घेतल्या.

**३.आवश्यक साधनांचा विचार-**

मुलांना स्वतः हुन आनंदाने, हासत, खेळत,आवश्यक तेथे सुलभकांची (मित्र,मोठे भाऊ बहिण,पालक इ.)मदत घेत अध्ययनास मदत करणारे साधन विकसित करणे.या साधनाला

**मुळशीच्या आनंदमाला** नाव देण्याचे ठरविले.या साधनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे असतील असे online चर्चेतून ठरविले.

- विषयांची एकात्मता (विविधविषयांच्या उद्दिष्ट यांना स्पर्श करणाऱ्या कृती व त्या कृती मागे मेंदूत सुरु असणाऱ्या प्रक्रियांचा विचार )
- विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव
- संवाद कौशल्याचा विकास
- मेंदूला आव्हान देणाऱ्या कृती
- अंदाज लावणे , संकलन, विश्लेषण ,वर्गीकरण या सर्व उच्च स्तरीय क्षमता विकसनास मदत
- ऑनलाइन व ऑफलाइन ( संपर्काचे माध्यम नसणारे )सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास उपयुक्त
- आवश्यक तेथे पाठयपुस्तकाचा संदर्भ (यामुळे सुलभक,पालक , स्वयंसेवक याना हाताळण्यास अतिशय उपयुक्त)
- मुलांच्या सृजनशीलतेला वाव
- स्वयं प्रेरणेने नवनिर्मितीचा निखळ आनंद २१ व्या शतकातील जीवन कौशल्यांचा विकास
- मूल्य संवर्धनास मदत
- स्वनिर्मितीस व स्वअभिव्यक्तीस भरपूर वाव
- परिसरातून शिक्षण
- प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञानप्राप्ती
- मुलांना आवश्यक तेवढा अवकाश
- सर्व स्तरातील सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त कृती
- विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडीचा प्रकर्षाने विचार
- विद्यार्थ्यांच्या विचारास स्वातंत्र्य
- शोधक प्रवृत्तीस चालना व शोधातून आनंद मिळवून देणाऱ्या कृती
- सद्यस्थितीत (कोविड काळात )वापरण्यास अत्यंत उपयुक्त
- इयत्ता व विषयांच्या चौकटीपलीकडचा विचार

असे साहित्य विकासित करताना कस लागणारच होता.यासाठी शिक्षकांची वैचारिक बैठक पक्की होणे आवश्यक होते.स्वतः हुन साहित्य विकसित केले हा अनुभव मिळणे आवश्यक होते.यासाठी समूहाला निश्चित अशा कृतींच्या मालिकेतून नेले.ज्यामुळे शिक्षकांना आपण काही वेगळे व भन्नाट(गटातील शिक्षकांनी वापरलेला शब्द) करत आहोत याची जाणीव झाली

**४.करावयाच्या कृतींचा क्रम.-** शिक्षकांना कोविड काळात भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांवर ऑनलाईन मीटिंग व शैक्षणिक गप्पांच्या माध्यमातून चर्चा घेण्यात आल्या. चर्चेतुन प्रत्येकाने कृतीपत्रिका, स्वाध्यायपुस्तिका,ऑडिओ, व्हिडिओ यांचे उत्कृष्ट नमुने तयार केले. त्यावर चर्चा झाल्या. त्यातील सर्वच नमुने सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकत नाहीत , यातून त्यातील उणिवा देखील लक्षात आल्या.कमतरता दूर करण्यासाठी नवनवीन पर्याय शोधण्याचा आमचा प्रवास यानंतर सुरू झाला. वेगळे , नवीन काय असावे या साठीचे नमुने मांडले गेले. मात्र कोणत्याही नमुन्याला चूक बरोबर असे न म्हणता अधिक चांगले काय असावे याच्या शोधात समूह पुढे मार्गक्रमण करीत राहिला.मेंदूचे शिक्षण नेमके कसे घडते यासाठी विविध तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रत्येक मूल आपल्या मेंदूचा वापर करून शिकत असतो. नवीन मिळालेल्या माहितीचा आपल्या पूर्वानुभवाशी संबंध जोडून तो प्रतिक्रिया देत असतो. या प्रतिक्रिया देण्यासाठी लागणारा प्रत्येकाचा कालावधी हा वेगवेगळा असतो. तसेच तो त्याच्या आवडीनुसार ,अनुभवानुसार बदलत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनुसार योग्य ते पोषक अध्ययन अनुभव ,अध्ययन वातावरण शिक्षकाने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे , याची तीव्र जाणीव झाली आणि शिक्षकांची बदलती भूमिका शिक्षकापुढे समोर नव्याने समोर आली. शिक्षकाची बदलती भूमिका म्हणजे सुलभकाची बदलती भूमिका-

- प्रत्येकाला मेंदू आहे याची जाणीव सतत ठेवणे.
- मेंदू हा शिकण्याचा महत्वाचा अवयव आहे, त्याचे शिकणे सतत सुरू असते,हे लक्षात घेणे.
- मेंदूला सतत नवनवीन आव्हाने स्वीकारायला आवडत असते.
- स्वतः कृती करून ,शोधून उत्तरे शोधणे मेंदूला आवडत असते.
- पूर्वानुभवाच्या आधारे प्रत्येकाचा मेंदू वेगवेगळ्या पद्धतीने विचार करत असतो.
- उत्तरपर्यंत पोहोचण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. काही उत्तरे प्रश्नाला व प्रश्न विचारणाऱ्यालाच आव्हान देत असतात.
- त्यामुळे सुलभकाला थोडा धीर धरायला हवा. कारण प्रत्येक मेंदूला विचार करण्यास वेळ द्यायला हवा.**मुलांना उत्तरे शोधण्यास अडचण येत असेल तर त्यांना दिलेले अध्ययन अनुभव व वातावरण शिक्षकाने बदलण्याची गरज आहे ही लक्षात घ्यावे- हे समूहाने सतत स्वतः वर बिंबवून घेतले. हे शिक्षकांचे शिकणे online समूह चर्चेतून घडत होते.**

- मेंदू आधारित अध्ययन आणि सुलभकाची सुयोग्य भूमिका याने समृद्ध झाल्यानंतर शिक्षकांचे गट करून त्यानुसार मुलांकरीता नवीन स्वयं शिक्षणाचा मार्ग शोधण्यासाठी प्रोत्साहन दिले.
- नंतर इयत्ता व शालेय विषय यानुसार गट अभ्यास केला बराचसा भाग सामाईक होता,विषयांचा समवाय दिसून आला.

- या अभ्यासातून शिक्षकांच्या असे लक्षात आले की, इयत्ता व विषय यांच्या भिंती मुलांच्या शिक्षणाच्या आड येत नाहीत.
- त्यानंतर **इयत्ता १ ली ते ५ वी चा संपूर्ण अभ्यासक्रम,पाठयक्रम ,पाठयपुस्तके , अध्ययन निष्पत्ती** यांचा अभ्यास केला गेला.
- त्यातून काही सामाईक घटक काढण्यात आले. त्यांना क्षेत्र म्हटले गेले. एकूण **१४क्षेत्रे** निश्चित करण्यात आली ,ही क्षेत्रे पुढील प्रमाणे - मीआणिकुटुंब
  - मीआणिअन्न
  - मीआणिपाणी
  - मीआणिवनस्पती
  - मीआणिप्राणी
  - मीआणिनिवारा
  - मीआणिआरोग्य
  - मीआणिजमीन
  - मीआणिहवा
  - मीआणिगाव
  - मीआणिवाहतूक
  - मीआणिसंदेशवहन
  - मीआणिआकाश
  - मीआणिआपत्ती व्यवस्थापन

- समुहाचे कार्य अधिक वेगाने पुढे न्यावे यासाठी कोअर गटाची निर्मिती करण्यात आली. (२२.६.२०२०) सुरवातीला **मी व माझे कुटुंब** ही एक क्षेत्र घेऊन प्रत्येकाने त्या क्षेत्राच्या विस्ताराची मांडणी केली. म्हणजेच ही क्षेत्र इयत्तानिहाय कसे विस्तृत होत गेले आहे , ते मांडले.**प्रत्येक क्षेत्राची आता इयत्तनिहाय , विषयनिहाय आणि पाठ्यपुस्तक संदर्भासह अशी परिपूर्ण व्याप्ती तयार झाली.ही क्षेत्रे वयोगटानुरूप काठिण्य पातळी लक्षात घेऊन, इयत्तानिहाय व विषय निहाय वाढत गेली आहेत का,याविषयी चर्चा व विचारविनिमय करून सुधारणा करण्यात आल्या**. प्रत्येक वेळी सुधारणा करताना चूक बरोबर असे न ठरविता अधिक चांगले काय असावे याचा शोध घेऊन , सर्वांच्या सहमतीने बदल करण्यात आले. प्रत्येक शिक्षकाचे मत विचारात घेतले जात होते.
- **क्षेत्र, व्याप्तीचा विचार व अभ्यास** करून एकाच क्षेत्रावर आधारित इयत्तानिहाय **कृतीपुस्तिका** तयार करण्यात आल्या .

- या कृतीपुस्तिका स्वयं अध्ययनासाठी परिपूर्ण आणि विद्यार्थ्यांना आवडतील याची दक्षता घेण्यात आली. यासाठी कृती प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना देऊन त्यांची मते विचारता घेऊन कृतीमध्ये बदल करण्यात आले.
- अतिशय आकर्षक , विद्यार्थ्यांना आव्हान देणाऱ्या , वैचारिक प्रक्रियेस चालना देणाऱ्या मी व माझे कुटुंब या क्षेत्राच्या कृतीपुस्तिका तयार झाल्या.
- त्या कृतीपुस्तिकांमध्ये आवश्यक तेथे पाठांशी निगडीत व्हिडिओ , ऑडिओ लिंक देण्यात आल्या.
- तसेच आवश्यक तेथे QR CODE देण्यात आले.
- सदर कृतीपुस्तिका अभ्यासून व त्यांचे सर्व सदस्यांच्या माध्यमातून परीक्षण करण्यात आले आणि विद्यार्थ्यांना त्या कृतीपुस्तिका सोडविण्यासाठी देण्यात आल्या.
- २१ व्या शतकातील जीवन कौशल्यांचा विकास ( स्व ची जाणीव,परिणामकारक संप्रेषण, समानानुभूती,समस्या निराकरण , निर्णय क्षमता, व्याकतीव्यक्तींमधील सहसंबंध , सर्जनशीलता विचार, चिकित्सक विचार ,भावनांचे समायोजन ,ताण तणावाचे समायोजन)यांचाही समावेश करण्यात आला.
- नवीन शैक्षणिक धोरणाचा विचारकेला गेला. प्रत्येकानेविकसित केलेल्याकृतीवरसखोलचर्चाघेण्यात आली
- कृतींमध्येविद्यार्थीनुरूपआणिइयत्तानुरूपसुधारणाआणिबदलकरण्यात आले.
- विद्यार्थ्यांनाशाळाआणिघरीप्रायोगिकतत्वांवरकृतीमालिका देऊन चाचपणी करण्यात आली
- शिक्षकांना स्वतःच्या मुलांमधीलसकारात्मकदृष्टिकोनबदललक्षात आला.

  आनंदमाला विकसनाची प्रक्रिया मोबाईल वर सुरु होती.

  आपले काम इतर शिक्षका कडून व शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी व जाणकार व्यक्ती कडून तपासले जाण्यासाठी त्यांच्या पर्यंत online पद्धतीने आनंदमाळे तील दुसऱ्या स्तराचे मी आणि कुटुंब ही आनंदमाला पाठवून त्यांच्या प्रतिक्रियाघेण्यात आल्या.त्यांच्या सूचनांप्रमाणे बदल करण्यात आले.मुळशी तालुक्यातील सुमारे ७०० शिक्षकापर्यंत आनंदमालेचे एक क्षेत्र पोहचविण्यात आले.त्यांच्या प्रतिसाद online घेण्यात आले.जुन २०२१ शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी हे करण्यात आल्याने तालुक्यात शैक्षणिक वातावरण तयार झाले.

**५.उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण –**

समूहातील शिक्षकांनी स्वतः अभ्यास करून सुलभकाचीभूमिका समजून घेतली.कृतियुक्त अध्ययन, ज्ञान संरचना वादी विचार व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी समजून घेतली. विविध संदर्भसाहित्याचा (इयत्ता १ ली ते ५ वीची पाठ्यपुस्तके,अभ्यासक्रम २०१२, राष्ट्रीय अभ्यासक्रम

आराखडा २०२१ इ.)अभ्यास केला. यातून स्वतः शिकण्याचा आनंद त्यांना मिळाला.मुळशी च्या आनंदमालेची  १३ क्षेत्रे तयार केली. प्रत्येक क्षेत्राच्या ५ स्तराच्या आनंद मला अशा ६५ आनंदमाला विकसित करण्याचे  नियोजन केले. त्यापैकी ४८ पुस्तिका तयार केल्या.शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसाद पुढील प्रमाणे

- शिक्षक म्हणून आम्ही या उपक्रमातून समृद्ध झालो.
- मुलांच्या मेंदूमध्ये शिक्षणप्रक्रिया कशी घडते,विद्यार्थ्यांना  पोषक अध्ययन अनुभव , अध्ययन वातावरण दिले पाहिजे याची माहिती झाली.
- मुलाना अध्ययनास संधी कशा निर्माण करून द्याव्यात , तयातून मुलांचे शोधक वृत्तीने शिकणे कसे होईल हा विचार प्रकर्षाने समोर आला.
- मोबाइल मध्ये नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळाली.
- ऑनलाइन मीटिंग , टायपिंग, एक्सेल शीट मध्ये काम करणे , गुगल फॉर्म तयार करणे, वेगवेगळ्या व्हिडिओ लिंक ॲड करणे ,QR कोड स्कॅन करणे आणि तो वर्ड मध्ये इनसर्ट करणे यासरख्या बाबी स्वतः हुन शिकलो.

➢ आनंदमालाया कृतीपुस्तिका घरतील मुलांना तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना देऊन पुढील प्रतिक्रिया दिल्या.

-शोधक वृत्ती वाढीस लागली.
सृजनशीलतेस वाव मिळाला
कल्पनाशक्ती विकासास चालना मिळाली
मुलाना नवनिर्मितीचा आनंद मिळाला
मुलांचे संवाद कौशल्याचा विकास होण्यास मदत झाली.
मुलांना स्वयं अध्ययनाची गोडी लागली.
आवश्यक तेथे पाठ्यपुस्तके ,लिंक्स ,व्हिडिओ पाहता येतील, त्यातून माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान  मिळाले.

## ६.कार्यवाहीचे टप्पे ( वेळापत्रक )

नियोजन

| अ.क्र. | कालावधी | करावयाचे काम |
|---|---|---|
| १ | जून २०२० | शिक्षकांच्या online समूह तयार करून करोना काळातील शिक्षण , सद्य स्थितीची जाण यावर चर्चा,.करोना संकट न मानता संधी समजून विद्यार्थी हिताचे कार्य स्वयं प्रेरणेन करून आपला सन्मान जपणे साठी कार्य करण्याचा |

| | | |
|---|---|---|
| | | निर्धार.नवीन साधन विकसित करण्याचे प्रयत्न |
| २ | जुलै२० | शिक्षक समृद्धीसाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके,राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा,ज्ञान संरचना वाद इत्यादींचे अभ्यास चर्चा ,आपण तयार करत असलेल्या साधनावर गटात प्रतिसाद घेणे ,साधनात सुधारणा करणे.तयार केलेल्या कृती मुलांसोबत करून पाहणे |
| ३ | ऑगस्ट २० | स्तर व क्षेत्र निहाय  पाठ्यपुस्तकातील घटक शोधणे.आनंदमाले त प्रत्येक क्षेत्राची स्तर निहाय चढत्या क्रमाने मांडणी करणे.मुलांसोबत कार्य करून पुस्तिका अधिक चांगल्या करणे.स्वतः चे तांत्रिक कौशल्य विकसित करणे |
| ४ | सप्टेंबर२०२० | २१ व्या शतकातील कौशल्ये,नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,मुलांचा आनंद यांचा विचार करून पुस्तिका अंतिम करणे.पुस्तिका विविध शिक्षक गटातत्यावर प्रतिसाद घेणे |
| ५ | ऑक्टोबर२० | एका क्षेत्रातील पाच ही स्तरातील आनंद् माला मोठ्याविद्यार्थी गटावर प्रयोगिक पद्धतीने राबवून शिक्षक व विद्यार्थी यांचाप्रतिसाद घेऊन बाकीच्या क्षेत्रात सुधारणा करणे.प्रायोगिक राबविण्या साठी विविध NGO चे सहाय घेणे. प्रायोगिक प्रकल्प साठी scert च्या संशोधन विभागाचे सहाय घेणे तसा प्रस्ताव सादर करणे. |
| ६ | नोव्हेंबर २० | प्रायोगिक अंमलबजावणी- onlineशिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थ्यापर्यंत साधन पोहोच  पूर्ण करून माहितीचे विश्लेषण करणे,आनंदमालेत आवश्यक त्या सुधारणा करून देणे. |

**प्रत्यक्ष कार्यवाही**

| | |
|---|---|
| २२ जून २०२० | कोरोनासंकट नव्हे संधी गटाची स्थापना |
| २२ जून २०२० | पाठ टाचण नमुना सादरीकरण व चर्चा |
| | गटाची कामे निश्चित झाली |
| | थीम निश्चित करणे.१४ थीम निश्चित झाल्या |
| | इयत्ता निहाय व्याप्तीलिहिणे(पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम याचा विचार करून) |

| | |
|---|---|
| | टाचण नमुना अंतिम करणे |
| | नमुन यानुसार एकच थीम वेगवेगळ्याइयत्तांमध्ये कशी पुढे जाते हे दाखविणे |
| | सुरुवातीला पहिली ते पाचवी चाविचार |
| | इयत्ता निहाय व्याप्ती लाथीमनुसार सुरुवात |
| | क्षेत्रे निवडली गेलीक्षेत्रांचा क्रम ठरवला त्यावर चर्चा झाली |
| २३ जून २०२० | मी आणि माझे कुटुंब या टीमचे व्यक्तीसाठी प्रत्येकाने काम सुरूकेले |
| | व्याप्ती गटावर शेअर करुन चर्चासुरू झाली |
| | सर्वांच्या व्याप्ती मधील मुद्देएकत्र करण्यात आले |
| २४ जून २०२० | सर्वांनी केलेले काम एकत्र करण्याची जबाबदारी दंडवते मॅडम यांनीघेतली |
| | मुलांच्या मेंदूत डोकावतानामाननीय श्रुती पानसे यांची लिंक सर्वांनी पाहिली |
| | दुपारी तीन वाजता गटाची झुममीटिंग झाली |
| | विषय न्याय इयत्ता निहाय क्षेत्रव व्याप्ती मांडण्याचे ठरले |
| | गटातील प्रत्येकाला दोन क्षेत्रेस्तर निहाय व्याप्ती साठी दिली गेली |
| २५ जून २०२० | स्वतःच्या कामाचे रिफ्लेक्शन |
| २६ जून २०२० | सर्वांचे व्यक्तीचे काम पूर्ण होत असताना मीटिंग साठी भेटायचे ठरले |
| २७ जुलै २०२० | सर्वांच्या व्याप्ती वर सुधारणांसाठी चर्चा झाली |
| १ जुलै २०२० | भूगाव येथे मीटिंग |
| | मुलांच्या मेंदूला आव्हान देणाऱ्या कृतींवर चर्चा |
| २ जुलै २०२० | मेंदूला हेतुपुरस्पर कार्यमग्न करण्यासाठी अनुभव देणे यावर चर्चा वउदाहरणे |
| ४ जुलै २०२० | संदीप वाकचौरे यांचे सुलभकांचे समृद्धीकरण याविषयी मार्गदर्शन |
| ५ जुलै २०२० | व्याप्ती वर चर्चा |
| ६ जुलै २०२० | zoom meeting |
| ७ जुलै २०२० | कृती मुलांना देऊन त्याचा प्रतिसाद घेण्याची सुरुवात |

| | |
|---|---|
| | आनंदमालेची निर्मिती करताना शिक्षक समृद्धी करण्याचा प्रवास सुरू |
| | कृती कुटुंबातील मुलांना देऊनत्यांच्या सोबत अनुभव व त्यावर गटात चर्चा सुरू झाली |
| ९ जुलै २०२० | कृतींची मांडणी करताना क्रियापदेकोणती असावीत यावर चर्चा |
| | पूर्व अनुभवावर आधारित कृतीआत्मविश्वास वाढला की आव्हानात्मक कृती यावर चर्चा |
| १० जुलै २०२० | कृतींचे विकसन करत असताना सुलभक म्हणून स्वतःच्या विचारात पडणाराफरक नोंदवणे |
| ११ जुलै २०२० | मिळवलेल्या माहितीच्या आधारे वेगवेगळे गट कसे होऊ शकतात याचीउदाहरणे |
| | गूगल क्लासरूम प्रशिक्षणासाठी सर्वांची नाव नोंदणी |
| १३ व १४ जुलै २०२० | मी आणि आकाश इत्यादी क्षेत्रावर चर्चा |
| १६ जुलै २०२० | इयत्ता पहिली व दुसरी मी व माझे कुटुंब चर्चा |
| १८ जुलै २०२० | इयत्ता तीसरी ते पाचवी साठी शेत्र व्यक्तीचे काम सुरू मी व माझेआरोग्य याबाबत चर्चा |
| १९ जुलै २०२० | मी व माझे गाव चर्चा |
| २१ जुलै २०२० | मी व वाहतूक चर्चा |
| २६ जुलै २०२० | कथा या घटकाचा प्रत्यक्ष अनुभव शेअर केला |
| | मुलांना आपण शिकवतो हे वाटणार नाही यावर विचार |
| २७ जुलै २०२० | घरातून शिकण्यासाठी मोठ्यांची भूमिका महत्त्वाची लोकमत दैनिक आतीलश्री लोखंडे लेख |
| २९ जुलै २०२० | सर्व क्षेत्रांवर चर्चा व पाचवी पर्यंत चे काम पूर्ण |
| ३ ऑगस्ट २०२० | सर्व क्षेत्र पहिली ते पाचवी चे काम पूर्ण |
| ६ ऑगस्ट २०२० | मीटिंग क्षेत्रानुसार इयत्तांचे वाटप |
| ८ ऑगस्ट २०२० | पाठ्यपुस्तके यांचा अधिक बारकाईने अभ्यास सुरू |
| | एकाच कृतीची व्याप्ती टप्प्याटप्प्याने कशी वाढत गेली यावर चर्चा वविचार |

| | |
|---|---|
| ९ ऑगस्ट २०२० | झूम मीटिंग प्रत्येक क्षेत्र प्रत्येक इयत्तेत कसे पुढे जाईल मुलशिकण्याच्या पायऱ्या लक्षात घेणे |
| १० ऑगस्ट २०२० | मुलांसोबत काम करत करत नेमकेपणा शोधणे |
| २० ऑगस्ट २०२० | इयत्ता निहाय क्षेत्र संकलन काम पूर्ण |
| ३० ऑगस्ट २०२० | झूम मीटिंग |
| | मी कुटुंब या क्षेत्राच्याऍक्टिव्हिटी निवडणे व फायनल करून विद्यार्थ्यांना देणे मुलांना यशाचा आनंद देतविविध प्रकारे अभिव्यक्त होत कृतींची इयत्तानिहाय निवड |
| ८ सप्टेंबर २०२० | मा.श्री.नीलेश निमकर यांचे व्याख्यान |
| | NEP विषयी चर्चा व सुरू असलेलेकाम या विषयी विचार |
| १२ सप्टेंबर २०२० | झूम मीटिंग |
| | कृती व कृतींची मालिका यांचीआकर्षक मांडणी |
| | कृतींना पाठ्यपुस्तकांचा संदर्भदेणे |
| १३ सप्टेंबर २०२० | NEP खुली चर्चा |
| १६ सप्टेंबर २०२० | केलेले काम तपासून पाहण्यास सुरुवात |
| | मोबाईल वरून पुस्तिका देणे |
| | चित्र व लिंक देण्याचा प्रयत्न |
| २१ सप्टेंबर २०२० | सुलभकांसाठी सूचना तयार करण्याचा प्रयत्न |
| | पुस्तक मुलांना देऊन प्रतिक्रिया घेण्यास सुरुवात |
| २४ सप्टेंबर २०२० | इयत्ता पहिली कृती मालिका मी व माझे कुटुंब यावर चर्चा |
| २७ सप्टेंबर २०२० | एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्यांसाठीची कौशल्य यांचा शोधकृतींमध्ये कशी प्रतिबिंबित होतात याचा विचार |
| १ ऑक्टो. २०२० | सर्व कामे मुलांना देऊन प्रतिसाद नोंदवण्यास सुरुवात |
| १८ ऑक्टो. २०२० | मुलांच्या प्रतिसादा नुसार बदल करण्यास सुरुवात |
| २६ ऑक्टो. २०२० | झूम मीटिंग |
| ३० जाने २०२१ | मी व अन्न  या क्षेत्राची तयारी सुरु चर्चा सुरू |
| ४ फेब्रु २०२१ | झूम मीटिंग |
| | सर्व क्षेत्रांचे काम पूर्ण होण्यासाठी चर्चा |

| | |
|---|---|
| ८ फेब्रु २०२१ | प्रत्येक इयत्तेच्या कलर प्रिंट काढण्याविषयी पहिली व शेवटचे पानयावर चर्चा |
| ११ फेब्रु २०२१ | जि प शाळा उरवडे येथे अभ्यास मालेचे कार्य करण्यासाठी कार्यशाळा |
| १६ फेब्रु २०२१ | अभ्यास मला विषय तज्ञ समाजातील इतर घटक यांना दाखवायला सुरुवात |
| १८ फेब्रु २०२१ | क्षेत्राविषयी तयार केलेल्या अभ्यासमालेची वैशिष्ट्ये लेखन |
| १९ फेब्रु २०२१ | नेमक्या आव्हानात्मक योग्य कृतींची निवड |
| २० फेब्रु २०२१ | मेंदू लेख - पायाभूत विचार समजण्यासाठी वाचन |
| २ मार्च २०२१ | मुलांनी एकत्र येऊन सहकार्यातून शिक्षण घडेल यावर चर्चा |
| ३ मार्च २०२१ | जिल्हा परिषद शाळा भूगाव येथे कार्यशाळा |
| ४ मार्च २०२१ | शिक्षण गुणवत्तापूर्ण होणार का ? संदीप वाकचौरे यांचा लेख व चर्चा |
| ६ मार्च २०२१ | सगळ्यांचे काम सगळ्यांनी बारकाईने पाहण्यास सुरुवात |
| २४ मार्च २०२१ | सुधारणा करून झालेल्या कामांचे पुन्हा मुलांमध्ये देणे सुरू |
| २२ एप्रिल २०२१ | मी व माझा गाव - सुधारित आवृत्ती चर्चा |
| | मी व माझे अन्न - सुधारितआवृत्ती चर्चा |
| | अशा प्रकारे प्रत्येक स्तराच्याप्रत्येक क्षेत्राच्या अभ्यासमाले वर चर्चा सुरू |
| १७ मे २०२१ | रेश्मा अग्रवाल मॅडम एज्युकेशनल एक्सपर्ट महाराष्ट्र स्टेट युनिसेफयांच्याशी चर्चा |
| १८ मे २०२१ | लाईफ फोर इक्विटी LEF चे हेड मधुकर बानोरी यांच्याशी चर्चा |
| २० मे २०२१ | LEF टीमचे मयुरेश भोईटे यांच्याशी चर्चा |
| १ जून २०२१ | वॉटर मार्क देण्याचा विचार |
| | माननीय संचालक श्री दिनकर टेमकर साहेब यांच्याशी चर्चा |

| | |
|---|---|
| २ जून २०२१ | देशपांडे सर यांच्याशी व्हाट्सअप द्वारे चर्चा |
| ३ जून २०२१ | सुलभकांसाठी चर्चा |
| | झूम मीटिंग LEF टीम सोबत |
| ४ जून २०२१ | मुळशीच्या आनंदमाला हा वॉटर मार्क ठरला |
| | मा. उपसंचालक काटमोरे साहेब यांच्या प्रतिक्रिया |
| ५ जून २०२१ | केलेल्या कामाची व्हिडिओ निर्मिती |
| ६ जून २०२१ | आनंदमालेविषयी केंद्रातील शिक्षकांचे प्रतिसाद |
| | मी व प्राणी क्षेत्र - लिंकद्वारे प्रसारित |
| ८ जून २०२१ | झूम मीटिंग |
| | काही तंत्रस्नेही शिक्षकांचाग्रुप मध्ये समावेश |
| | लिंक तयार करण्यासाठी प्रशिक्षण |
| ९ जून २०२१ | गुगल मीट |
| | पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तयारकरणे संविधान तक्ता अध्ययन निष्पत्ती यांचा पाया |
| १० जून २०२१ | रुबरिक्सतयार करणे |
| ११ जून २०२१ | मी आणि प्राणी या पुस्तिकेवर मुलांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास |
| १२ जून २०२१ | आनंदमालेच्या पीपीटी ची निर्मिती |
| | आनंदमालेच्या उद्दिष्टांचीशब्दबद्ध मांडणी |
| १७ जून २०२१ | SCERT चा प्रमुख डॉ. गीतांजली बोरुडे यांच्याशी संवाद |
| | आनंद मालेच्या अभिप्रायांचीनिर्मिती - विद्यार्थी पालक शिक्षक यांचे अभिप्राय |
| | SCERT साठी प्रस्ताव |
| १८ जून २०२१ | प्रत्येक आठवड्याला एक आनंदमाला प्रायोगिक स्तरावर देण्याचा विचार |
| | प्रत्येक कृतीतून कोणत्या अध्ययननिष्पत्ती साध्य होतात याचा विचार |
| | झूम मीटिंग |

| | |
|---|---|
| १९ जून २०२१ | सुलभक मार्गदर्शक सूचनांची निर्मिती |
| २० जून २०२१ | पहिली साठी काम अक्षर गट निर्मिती |
| | आडमाळ केंद्रातील शिक्षकांचा गटात समावेश |
| २१ जून २०२१ | गणित या विषयाचा Graded कृतींचा समावेश करण्यास सुरुवात |
| २५ जून २०२१ | माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षणाधिकारी यांच्यासमोरसादरीकरण |

**७.उपक्रमासाठी इतरांची मदत-**

आनंदमाला निर्मितीपूर्वी शिक्षकांची वैचारिक बैठक पक्की होण्यासाठी डॉ. व. सी. देशपांडे व श्री.संदीप वाकचौरेमार्गदर्शनपर व्याख्यान दिले.कोविडकाळात शिक्षक गटासोबत कार्य करावे लागणार असल्याने या कार्यास श्री.संदिप जठार साहेब ,गटविकास अधिकारी मुळशी यांनी परवानगी व प्रोत्साहन दिले.कोविड चे नियम शिथिल होताच समूहाच्या तीन तीन दिवशीय कार्य शाळा आयोजित करण्यास गट शिक्षण अधिकारी,मुळशी श्री.माणिक बांगर यानी परवानगी दिली तसेच एका कार्यशाळेत येऊन मार्गदर्शनही केले. पिरंगुट बीट मधील केंद्र प्रमुख,भूगाव श्री.ठकोरे, केंद्रप्रमुख उरवडे श्री.गायकवाड,केंद्र प्रमुख आंद्गाव श्रीम.भोई, केंद्र प्रमुख कोळवडे श्रीम.भंडारे यांनी कार्यशाळेस उपस्थित राहून मार्ग दर्शन केले.आडमाळ केंद्र प्रमुख श्री.पासलकरसर यांनी त्यांच्या केंद्रातील २० शिक्षकांच्या मदतीने आनंदमालेचे परीक्षण करून घेतले व सुधारणा सुचविल्या.lfe टीम चे श्री.मयुरेश भोईटे,श्री.जठार,श्री.शिंदे यांनी online चार्चाकारून पूर्व व अंतिम चाचणी कशी घ्यावी याचेमार्ग दर्शन केले.तसेच गुगल लिंक तयार करून त्यांचे प्रतिसाद कासे घ्यावेत याचे online प्रात्यक्षिक करून घेतले.तसेच प्रायोगिक स्तरावर याची अंमलबजावणी कशी करता येईल याची माहिती दिली.आनंदमालेचे मी आणि प्राणी हे क्षेत्र अभ्यासून बालभारती,विद्या प्राधिकरण, डाएट मधील विविध अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन समूहाचा उत्साह वाढविला. माजी शिक्षण उपसंचालक श्री विद्याधर शुक्ल साहेब यांनी आनंद मालेची बारकाई ने माहिती घेऊन कामाचे कौतुक केले,व स्वतः यात सहभागी होण्याची तयारी दर्शवली. विविध शिक्षक गटांनी भरभरून प्रतिसाद देऊन आनंदमालेचे कौतुक केले.काही समाजसेवी , स्वयं सेवी संस्थांनी स्व खर्चाने आनंद मालेच्या प्रती दिल्या.समूहातील सदस्य श्रीम आशा पवार यांनी स्व खर्चाने मी आणि प्राणी या क्षेत्राच्या प्रत्येक क्षेत्राच्या प्रत्येकी ५०प्रति अशा २०० काढून विद्यर्थ्याना दिल्या.

**८.उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे-**

१. whatsapp वरील समूह व त्यावर झालेल्या चर्चा

२.पाठ्यपुस्तकातील क्षेत्रनिहाय काढलेले घटक

३.आनंद मालेची स्तर निहाय ,विषय निहाय चढती मांडणी दर्शवणारे तक्ते.

४.आनंद मालेची क्षेत्र निहाय व स्तर निहाय तयार केलेल्या ४८ पुस्तिका.

५.विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाचे फोटो.

६.समुहाचे प्रतिसाद (screen shots)

७.शिक्षकांचे प्रतिसाद

**५.नवोपक्रमाची कार्यपद्धती**

१. **पूर्व स्थिती निरीक्षणे व त्यांच्या नोंदी-**

- कोविड काळात शिक्षण कसे सुरु ठेवावे याचा कोणालाही अनुभव नव्हता
- विद्यार्थी समोर नसताना पाठ्यपुस्तक पूर्ण करण्याचाताण शिक्षकांवर येत होता.

- विविध यंत्रणा वेगवेगळे online उपक्रम राबवीत होत्या व् त्याची संखीकीय माहिती मागवत होत्या.
- पाठ्यपुस्तकातील धडे शिकवताना मोबाईल असणाऱ्या विद्यार्थ्यंचा प्रतिसाद अत्यल्प होता .उर्वरित विद्यार्थ्यासाठी परिणाम कारक योजनानव्हती.शिक्षक निराश झाले होते.
-पालक,शिक्षक,विद्यार्थी सर्वच जण विचित्र स्थितीत अडकलेले होते .विद्यार्थ्यावर अभ्यासाचा दबाव वाढत होता. मानसिक स्वास्थ्य हरवले जात होते.
- विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्या साठी व अभ्यासास प्रवृत्त करण्यासाठी नवीन उपयाची गरज होती.
- मोबाईल असणारे, मोबाईल संपर्काच्या बाहेर असणारे या सर्वासाठी आनंद देत अध्ययन अनुभव देणारे साधन आवश्यक होते

२. **कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन**

- शिक्षकांना स्वतःहून काही करण्याची उर्मी जागृत झाली होती.

-video ,कृतीपात्रिका किंवा इतर online साधने केवळ दिखावू ठरत आहेत हे अनुभवातून जाणवले**. त्यामुळे शिक्षक स्वतःहून नवीन साधन करण्यास तयार उत्सुक झाले.**

- शिक्षकांच्या अनुभवाच्या परंतु या काळात अयोग्य असणाऱ्या धरणा बदलविण्यासाठी बरेच कष्ट पडले.

-शिक्षकांना साहित्य तयार करायचे म्हंटल की पटकन तयार करत परंतु त्यात नाविन्याचा अभाव असे किंवा विद्यार्थ्यांचा विचार नसे.त्यामुळे आनंदमालेपर्यंत स्वतः पोहचून यशाचा आनंद घेण्यापर्यंतचा प्रवास खूपच अस्वस्थता निर्माण करणारा होता.

-शिक्षक स्वतः हुन नवीन तांत्रिक बाबी शिकण्यास उत्सुक झाले.

-नवोपक्रमाच्या मूल्यमापनासाठी

३.**उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरक्षणे व नोंदी**

-शिक्षकांना स्वतःला नाविन्यपूर्ण साहित्य निर्माण करण्याची संधी मिळाली , तसेच नवनवीन तांत्रिक बाबी आत्मसात करून त्या सहज हाताळण्याचे कौशल्य प्राप्त झाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला.त्यातूनचत्यांचाआत्मसन्मानजपलागेला.

-विषयाची उद्दिष्ट साध्य करत असताना त्यासाठी आनंद दायी कृती तयार करणे,त्याची भाषा नेमकी विद्यार्थ्यांना समजेल अशी ठेवणे व विद्यार्थी कृती करत असताना त्याच्या मेंदू मध्ये कोणत्या प्रक्रिया सुरु राहतील याचा विचार करण्याचे शिक्षक शिकले.

- बऱ्याच शिक्षकांना पारंपारिक विचारसरणीची जी सवय लागली होती, त्या विचारांना छेद देऊन प्रत्येक मुलाकडे पाहण्याचा, त्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त करण्याचा मूलमंत्रच जणू त्यांना मिळाला. त्यांना मेंदूआधारीत अध्ययन , ज्ञानसंरचनावादाचे प्रत्यक्ष उपयोजन, कृतीयुक्त शिक्षण प्रवाहाचे प्रत्यक्ष उपयोजन या शिक्षण प्रवाहांची केवळ माहितीच मिळाली नाही तर त्यांनी हे शब्द स्वतः अनुभवले.

- शिक्षकांच्या मदतीने मुलांसाठी नाविन्यपूर्ण , आनंददायी , मुलांना हवेहवेसे वाटणारे व स्वयंअध्ययनातून गुणवत्तापूर्ण शिक्षण घडवून आणणारे साहित्य तयार करण्याचा स्वानुभव शिक्षकांना मिळाला. स्वतः कृतीतून शोधक वृत्तीने शिकण्याचा आनंद त्यांनी स्वतः घेतला, त्यामुळे त्यांना साहित्य निर्मितीचे काम कंटाळवाणे न वाटता आनंददायी वाटले.

- शिक्षकांना टायपिंग पासून ते एक्सेल शीट करणे, चित्रे ॲड करणे, त्याना वेगवेगळे इफेक्ट्स देणे, बुकलेट तयार करणे या सर्व गोष्टी शिक्षक स्वप्रयत्नांतून कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय सहकार्यातून शिकले, त्यामुळे साहजिकच सहकार्यातून शिक्षणाचे महत्व नकळतच बाणवले.

**४.कार्यवाही करताना आलेल्या अडचणी-**

शिक्षकाकडे संगणक, laptop उपलब्ध नसल्याने मोबाईल वर साधन तयार करावे लागले,त्यासाठी वेळ गेला.

- कोविडकाळातसहभागी शिक्षकव त्यांचे कुटुंबीय आजारीपडल्यानेसमूहाचेकामकाजातव्यत्ययआलाआणिकामाचीगतीकमीझाली.

- प्रत्येकवेळीशिक्षकांनाऑनलाईनसभाघेऊनत्यांच्याशीसुसंवादसाधतअसल्यानेप्रत्यक्षभेटीआणि ऑनलाईनसुसंवादयामुळेनिर्माणहोणारीदरी ,कामाचावेगकमीकरण्यासकारणीभूतठरली.

- अचानकशासनाचेसेतूअभ्यासक्रम , LLRP यासारखेकाहीउपक्रमशाळांमध्येराबविण्यातआल्यानेआनंदमाला विकसनाचा वेग मंदावला.

- मोबाईल वर तांत्रिककामांचीनवनवीनकौशल्येहस्तगतकरूनत्यातप्राविण्यमिळवूनपुस्तिकातयारकरण्यातशिक्षकांचाबराचवेळगेला.

**५.माहिती विश्लेषण,आलेख,तक्ते**

**कोअर गटाचा प्रतिसाद -**

**कोअर गटात १० शिक्षक होते.त्यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रतिसादावरून पुढील निरीक्षणे नोंदवून त्याचे विश्लेषण केले आहे**

| निरीक्षणे | संख्या |
|---|---|
| आत्म विश्वास वाढला . | १० |
| शिक्षणातील नवीन प्रवाहांची माहिती झाली | १० |
| विद्यार्थ्यासाठी आनंदमाला तयार करण्यात सहभाग | १० |
| तांत्रिक कौशल्यात वाढ झाली | १० |

विश्लेषण- करोना कालावधीत समुहातील सर्वच शिक्षकांचा नाविन्यपूर्ण कार्य् करून आत्म सन्मान जपला गेला,त्यांचा आत्मविश्वास वाढला ,त्यांना शिक्षणातील नवीन प्रवाहांची माहिती झाली व याच गटाने इयत्ता पहिली ते पाचवी साठी पाच स्तरांपैकी चार स्तरांच्या १४ क्षेत्रातील ४८ आनंदमाला (विद्यार्थ्यासाठी कृती पुस्तिका )अत्यंत विचारपूर्वक तयार केल्या.त्यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक कौशल्य स्वतः हुन मिळविली (ऑनलाइन मीटिंग , टायपिंग, एक्सेल शीट मध्ये काम करणे , गुगल फॉर्म तयार करणे, वेगवेगळ्या व्हिडिओ लिंक ॲड करणे ,QR कोड स्कॅन करणे आणि तो वर्ड मध्ये इनसर्ट करणे, इत्यादी )

७जुन २०२१ रोजी बीटलेलिंकद्वारे स्तर २ - मी आणि प्राणी या क्षेत्राची आनंदमाला मुळशी तालुक्यातील शिक्षक समुह वर पाठविण्यात आली.७१० शिक्षकापैकी ४४६ शिक्षकांनी whatapp वर संदेश ( वैयक्तिक ,शिक्षक समुहात )पाठवून प्रतिसाद दिला त्यांच्या प्रतीसाद्चे विश्लेषण पुढील प्रमाणे

| प्रतिसादाची वाक्ये | प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या |
|---|---|
| मुलांना आनंद देणाऱ्या कृती | ४१२ |
| वयोगटाचा विचार करून मांडलेल्या कृती | ३९८ |
| विषयांची एकात्मता | ३०९ |
| विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव | ४४० |

| | |
|---|---|
| संवाद कौशल्याचा विकास | ४४२ |
| मेंदूला आव्हान देणाऱ्या कृती, विचारास चालना देणाऱ्या प्रवृत्त करणाऱ्या कृती | ४०१ |
| तर्क व निरीक्षण क्षमता विकसनास मदत | ४२७ |
| अंदाज लावणे , संकलन विश्लेषण ,वर्गीकरण या सर्व उच्च स्तरीय क्षमता विकसनास मदत | ३५८ |
| ऑनलाइन व ऑफलाइन ( संपर्काचे माध्यम नसणारे ) पोहोचण्यास उपयुक्त | ३७८ |
| आवश्यक तेथे पाठयपुस्तकाचा संदर्भ ( यामुळे सुलभक ,पालक , स्वयंसेवक याना हातळण्यास अतिशय उपयुक्त ) | ४५१ |
| लहान वर्गासाठी पालकांचा सहभाग | ४२७ |
| रंगीत व आकर्षक मांडणीची कृतीपुस्तिका | ४४१ |
| मुलांच्या सृजनशीलतेला वाव | ३७८ |
| स्वयं प्रेरणेने नवनिर्मितीचा निखळ आनंद | ३८९ |
| पुढीलआनंदमाला लवकर उपलब्ध व्हाव्यात | २७७ |

बहुतांश शिक्षकांनीआनंदमालेचे स्वागत केले व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद घेऊन प्रतिक्रिया दिल्या असता त्यांना त्या उपयुक्त वाटल्या.

-राज्यातील शिक्षक गटावर आनंदमाला पाठ्विल्या असता १२२८ व्यक्तींनी त्या पहिल्या त्यातील बऱ्याच व्यक्तींनी याच्या उपयुक्तते विषयी प्रतिसाद दिला आहे.

६.**नवोपक्रमाची यशस्विता**

-इयत्ता पाहिली ते पाचवीच्या आनंदमालेच्या ४८ पुस्तिका विकसित (online चर्चा व मोबाईलवर काम करून ) झाल्या.

-कोविड काळात बाहेरच्या परिस्थितीने काहीसे हताश, निराश झालेल्या शिक्षकांना नव्याने काम करण्यास उत्साह निर्माण झाला, स्वयंप्रेरणा मिळाली.

- प्रथम १० शिक्षकांना व नंतर अन्य शिक्षकांना (१२ ) नाविन्यपूर्ण साहित्य तयार करण्याचा त्याचे मूल्यमापन करण्याचा अनुभव मिळाला, त्यातून त्यांच्या ज्ञानात तर भर पडलीचशिवाय अंतिमतः विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा झाला.

- शिक्षक कार्यप्रवण झाल्याने नवनवीन कल्पना समोर येऊ लागल्या, कोविड काळातही विविध अडचणींना सामोरे जात शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून ज्ञानदानाचे कार्यसक्षमपणे करू लागले.

- विद्यार्थी व पालक यांनाही उपक्रमात सहभागी केले जात असल्याने शिक्षकांच्या नाविन्यपूर्ण कामाचे पालकवृंदास समाधान मिळू लागले.

- पालक, ग्रामस्थयांचाहीसहभागअसल्यानेशिक्षकांचेकष्ट ,कामसमाजासमोरचांगल्यादृष्टिकोनातूनपुढेयेऊलागले.

- मोबाईल, लॅपटॉपकिंवाअन्यसाधनांद्वारेनवनवीनतांत्रिककौशल्येहस्तगतकरण्याविषयीचाशिक्षकांचाआत्मविश्वासवाढला. त्यांनानाविन्यपूर्णगोष्टी, तंत्रेशिकण्याचीजिज्ञासानिर्माणझाला. विद्यार्थ्यांबरोबरचशिक्षकांचीहीशोधकवृत्तीवाढीसलागली.

- अध्ययन अध्यापनातील नवनवीन संकल्पनांची ओळख झाली, तज्ञांमार्फत बारकावे कळले ,त्यामुळे शिक्षकांच्या पारंपारिक समजेला धक्का बसून मुलांकडे , विद्यार्थी अध्ययनअध्यापन याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.

-नव्या शैक्षणिक प्रवाहांची शिक्षकांनी स्वतः हुन माहिती करून घेतली व त्यातील तत्वे (कृतियुक्त अध्ययन, मेंदूत घडणाऱ्या प्रक्रियांसाठी कृती देणे,विषयांची एकात्मता, उपलब्ध ,ज्ञान संरचना वाद इ.)आपल्या पुस्तिकेत उतरवली.

- एखाद्या नवोपक्रमाचे मूल्यमापन करण्याच्या पायऱ्या समजल्या.पूर्व चाचणी,उत्तर चाचणी ,रुब्रीक्स तयार करण्याचा अनुभव आला.

-जूनच्या सुरुवातीलाच आनंदमाला पाहणे व त्यावर प्रतिसाद देणे यामुळे मुळशी तालुक्यातील शालापूर्व तयारी अधिक उत्साहवर्धक झाल. शिक्षक आनंदमालेच्या सर्व स्तराच्या सर्व क्षेत्रांची मागणी करू लागले.

**७.समारोप**

करोनाचा परीक्षा पाहणारा कालावधी संकट नव्हे संधी समजून विस्तार अधिकारी या नात्याने काम सुरु केले. आपल्याला वेगळे नाविन्य पूर्ण कार्य करायचे आहे त्यासाठी स्वयं प्रेरणाने काम करणाऱ्या शिक्षकांचा गट तयार होत आहे, हे समजताच सुरुवातीला ३५ शिक्षकांचा गट तयार झाला.(whatsapp समूह).या समूहाने अभ्यासक्रम,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,शिक्षणातील नवीन प्रवाह यांचा अभ्यास केला.गटाच्या समृद्धी साठी विविध स्रोत (तज्ज्ञ,पुस्तके,साहित्य इ.) उपलब्ध करून दिले. पुढे या शिक्षकांच्या पैकी १० शिक्षकांनी इयत्ता पहिली ते पाचवी साठी पाच स्तरांच्या व १४ क्षेत्रात विभागलेल्या एकूण ४८ आनंदमाला (विद्यार्थ्यांसाठी कार्य पुस्तिका) विकसित केल्या(कोणताही पूर्व अनुभव नसताना) .या पुस्तिका तयार करताना त्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य आत्मसात केली, आपला आत्म विश्वास वाढता ठेवला. मुळशी च्या या गटाने केलेले कार्य राज्यातील अनेक शिक्षकांनी online पहिले व त्याला उत्तमप्रतिसाद दिला.विद्यार्थ्यासाठी उत्तम दर्जाचे अध्ययन साहित्य विकसित झाले.या साहित्याचा व हे तयार करणाऱ्या शिक्षक गटाचा उपयोग राज्याची बौद्धिक संपत्ती म्हणून निश्चित होणार आहे.

मुळशी तालुक्यात झालेले शिक्षक समृद्धी व विद्यार्थी साहित्य याचें मूल्यमापन संशोधनाच्या अंगाने होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यासाठी उपयुक्त आनंदमाला योग्य पद्धतीने त्यांच्यापर्यंत पोहचणे आवश्यक आहेत.

## ८.संदर्भ सूची व **परिशिष्टे**.

इयत्ता १ ली ते ५ वीची मराठी माध्यमाची सर्व पाठ्यपुस्तके,
अभ्यासक्रम २०१२,
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२१,
अभ्यासक्रम २०१२शिक्षक हस्तपुस्तिका
अध्ययननिष्पत्तीमार्गदर्शिका
इयत्तनिहायव्यवसायमाला
नवोपक्रमपुस्तिका
प्रकल्पउपक्रमस्तिका
क्षमताधिष्ठितअभ्यासक्रमउद्दिष्टे
सुगमभारतीचीपुस्तके

**परिशिष्टे**.(शब्द मर्यादा असल्याने परिशिष्टात समविष्ट करावयाच्या बाबीची केवळ नावे देत आहे.याचे पुरावेव सर्व मजकूर pendrive वर उपलब्ध आहे.)

१. पूर्व अभ्यास तक्ते - क्षेत्र निश्चित करून इयत्ता १ ते ५ च्या विविध पाठ्यपुस्तकात हे क्षेत्र कसे येत आहे यांचे तक्ते.
२. प्रत्येकक्षेत्र निहाय व स्तर निहाय चढत्या क्रमाने आलेल्या कृती.
३. स्तरनिहाय आनंदमाला
४. क्षेत्र निहाय आनंदमाला
५. प्रवास शिक्षक समृद्धीचा - कोअर गटातील सदस्यांच्या चर्चा, प्रतिसाद.
६. शिक्षण क्षेत्रातील विविध घटक- विद्यार्थी,पालक,शिक्षक,अधिकारी, अधिव्याख्याता,बालभारती मधील अधिकारी,समाजातील शिक्षण प्रेमी मान्यवर यांच्या online प्रतिक्रिया
७. आनंद मालेची महती सांगणारी video क्लीप

शिक्षक समृद्धीसाठी लेख,चर्चा सत्र

















शिक्षक समृद्धी online सुसंवाद ,चर्चा,प्रतिसाद




शैक्षणिक वातावरण तयार करणारे इतर शिक्षकांचे प्रतिसाद



विद्यार्थ्यांची क्षणचित्रे काही क्षणचित्रे

कौटुंबिक स्वास्थ्य, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा इ.

• व्यवहार ज्ञान, दैनंदिन-रोजच्या जीवनाशी सांगड




## विद्यार्थी प्रतिसाद... काही क्षणचित्रे

विषयांची एकात्मता




## विद्यार्थी प्रतिसाद... काही क्षणचित्रे

ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिये यांचा पुरेपूर वापर, स्वतः चे नियम, गट ...

